UNIQUE academy

UNIQUE Institute of Higher Learning Pvt. Ltd.

Apt. No. Nto 06, Vastu Chamber's, Shirole Road, S. No. 1202/39, Opp Fergusson College Main Gate, Pune - 411004, Ph. . 020-25530950

दिनांक : 23 / 08 / 2022

To,
मा. प्राचार्य,
डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, जि. सातारा.

**विषय : UPSC/MPSC स्पर्धा परीक्षासंदर्भात कार्यशाळा आयोजित करणेबाबत.**

**सस्नेह नमस्कार**

महोदय, 'द् युनिक अॅकॅडमी' स्पर्धा परीक्षांची तयारी या क्षेत्रात 2006 ते 2007 या वर्षापासून कार्यरत आहे. राष्ट्रीय राज्य प्रशासनासाठी सुजाण व संवेदनशील अधिकारी घडवायचे काम व्यासायिक दृष्टिकोनातून आपली संस्था यशस्वीपणे करत आहे. सोबत सामान्य नागरिक, विद्यार्थी, संशोधक, विविध क्षेत्रातील अभ्यासक यांना उपयुक्त ठरतील अशा व्याख्यानमाला, परिसंवाद, संशोधन अभ्यासप्रकल्प आणि विविध अभ्याससाहित्यांचे प्रकाशन इ. उपक्रमांचे आयोजन 'द् युनिक अॅकॅडमी तर्फे' नियमित केले जाते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना UPSC & MPSC मार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांबाबत योग्य माहिती देणे हा या उपक्रमांपैकी एक महत्वपूर्ण उपक्रम आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात विद्यार्थ्यांना करीयरच्या अनेक पर्यायांची माहिती हाताच्या बोटावर जरी असली तरी या माहितीत अनेकदा अचूकतेचा अभाव आढळतो. महाविद्यालयीन विद्यार्थी पदवीनंतर विविध पर्यायांची माहिती घेत असतात. अशावेळी विद्यार्थ्यांना उपयुक्त, नेमकी माहिती उपलब्ध करून देणे त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी अत्यंत गरजेचे महत्वपूर्ण आहे. 'द् युनिक अॅकॅडमी' 2006-07 पासून विविध स्पर्धा परीक्षांबाबत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालये, संस्थामध्ये 'स्पर्धा परीक्षांचे स्वरूप व तयारी' या विषयावर कार्यशाळा आयोजित करत असते. ज्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे.

द् युनिक अॅकॅडमी व आपली संस्था याच्या वतीने अशा प्रकारची कार्यशाळा आपल्या महाविद्यालयात संस्थेत आयोजित करण्याचा आमचा मानस आहे. या पत्रासोबतच एकदिवसीय कार्यशाळेचे स्वरूप कसे असेल याची माहिती जोडली आहे. तरी आपल्या संस्थेत, महाविद्यालयात अशी कार्यशाळा आयोजित करण्यासाठीच्या प्रस्तावास आपण सकारात्मक प्रतिसाद द्याल, ही नम्र विनंती.

To M.B.E.T.

डॉ.पी. भोसले कॉलेज,कोरेगांव
आवक नं:- 706
दिनांक:- 30/08/2022

**आपला नम्र**

**चंद्रकांत खराटे – समन्वयक**
**द युनिक अॅकॅडमी, पुणे**
**9823683344**

# ‘द युनिक ॲकॅडमी, पुणे’ द्वारा आयोजित व्याख्यान सत्र

| अ. क्र. | सेमिनार (व्याख्यान) | व्याख्यानातील मुद्दे | तासिका |
|---|---|---|---|
| 1 | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन (10 वी व 12 वी विद्यार्थ्यांसाठी) UPSC/MPSC | ■ स्पर्धा परीक्षा म्हणजे काय? महत्त्व, गरज इ.<br>■ विविध स्पर्धा परीक्षेची ओळख.<br>■ सामान्य ज्ञान व चालू घडामोडीची ओळख.<br>■ प्रश्नोत्तर | $1\frac{1}{2}$ |
| 2 | UPSC/MPSC स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन (महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी) | ■ UPSC/MPSC या संस्थेचे महत्त्व.<br>■ या परीक्षेद्वारे निवडली जाणारी पदे.<br>■ परीक्षा पद्धती, अर्हता.<br>■ अभ्यासक्रम, अभ्यासपद्धती.<br>■ प्रश्नोत्तर | $1\frac{1}{2}$ |
| 3 | UPSC मार्गदर्शन (महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी) | ■ स्पर्धा परीक्षेची आवश्यकता.<br>■ UPSC/MPSC संस्थेचे महत्त्व, भरली जाणारी पदे.<br>■ अर्हता, परीक्षा पद्धती.<br>■ पूर्व (सामान्य ज्ञान + सी सॅट).<br>■ मुख्य परीक्षा, मुलाखत.<br>■ प्रश्नोत्तर. | $1\frac{1}{2}$ |
| 4 | MPSC मार्गदर्शन (महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी) | ■ MPSC या संस्थेचे महत्त्व.<br>■ या परीक्षा पद्धतीद्वारे भरली जाणारी पदे.<br>■ अर्हता, परीक्षा पद्धती.<br>■ बदललेल्या अभ्यासक्रमाची माहिती.<br>■ पूर्व-मुख्य मुलाखत.<br>■ प्रश्नोत्तर. | $1\frac{1}{2}$ |
| 5 | UPSC आणि MPSC एक दिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा | **प्रथमसत्र**<br>■ UPSC महत्त्व, स्वरुप.<br>■ या परीक्षेद्वारे भरली जाणारी पदे.<br>■ परीक्षा पद्धती, अर्हता.<br>**द्वितीयसत्र**<br>■ MPSC महत्त्व, स्वरुप.<br>■ या परीक्षेद्वारे भरली जाणारी पदे, परीक्षा पद्धती, अर्हता.<br>■ प्रश्नोत्तर तास | $1\frac{1}{2}$<br>+<br>$1\frac{1}{2}$<br>+<br>1 |
| 6 | SSC (Staff Selection Comm.) मार्गदर्शन | ■ SSC तर्फे घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षा<br>■ SSC बद्दल संपूर्ण मार्गदर्शन.<br>■ प्रश्नोत्तर | $1\frac{1}{2}$ |
| 7 | Banking मार्गदर्शन | ■ Banking क्षेत्रात होणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षा<br>■ P. O. बद्दल संपूर्ण मार्गदर्शन.<br>■ प्रश्नोत्तर | $1\frac{1}{2}$ |
| **व्याख्यानाचे मानधन–प्रत्येकी तास** | | **प्रवास खर्च –** | |